
दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET
Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-३ ■ अंक-७४ ■ शनिवार, दि. ३ मे २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.3 ■ Issue -74 ■ Saturday, 3 May 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## हर हर महादेव! केदारनाथ मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी खुले



**केदारनाथ :** देवभूमी उत्तराखंडमधील केदारनाथ धामचे कपाट विधी पूजनासह आज, शुक्रवारी सकाळी ७ वाजल्यापासून भाविकांसाठी खुले करण्यात आले आहे. या सोहळ्यात मुख्यमंत्री पुष्कर सिह धामी यांनी देखील उपस्थित राहून सर्वांना सर्व भक्तांना शुभेच्छा दिल्या.

पुजाऱ्यांनी 'ॐ नम: शिवाय' मंत्रोच्चार करत आणि भाविकांच्या बम बम भोले या जयजयकारात आज, शुक्रवारी सकाळी केदारनाथ मंदिराचे दरवाजे उघडण्यात आले. गुरुवारी(दि.१) बाबा केदार यांची पंचमुखी पालखी केदारनाथ धामला पोहचली. केदारनाथाचं दर्शन करण्यासाठी जवळपास १५ हजाराहून अधिक भाविक तिथे दाखल झाले होते. मंदिराचे दरवाजे उघडले तेव्हा भक्तांच्या हर हर महादेवच्या जयजयकाराने परिसर दुमदुमून गेला.

**१०८ क्विंटल फुलांची सजावट**

केदारनाथ मंदिराचे कपाट उघडण्याच्या सोहळ्यासाठी मंदिराला १०८ क्विंटल फुलांनी भव्यप्रकारे सजवण्यात आले होते. गुरुवारी राज्याचे डीजीपी दीपम सेठ आणि अप्पर पोलीस महासंचालक वी मुरूगेशन यांनी श्री बद्रिनाथ आणि केदारनाथ धाम याठिकाणी पाहणी करत सुरक्षा व्यवस्था आणि अन्य तयारीचा आढावा घेतला.

यंदा केदारनाथ यात्रेत गर्दीचं नियोजन करण्यासाठी टोकन व्यवस्था लागू करण्यात आली आहे. टोकन काऊंटर वाढवणे, पीए सिस्टममधून भक्तांची माहिती, स्क्रिनवर स्लॉट आणि नंबर जारी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. एटीएस, पॅरा मिलिट्री दल हेदेखील सुरक्षेसाठी तैनात करण्यात आले आहे. हेलिकॉप्टरमधून भाविकांवर पुष्पवृष्टी

केदारनाथ मंदिराचे दरवाजे उघडण्याच्या काही वेळ आधी, राज्याचे मुख्यमंत्री पुष्कर धामी केदारनाथला पोहोचले. दरवाजे उघडताच, हेलिकॉप्टरमधून भाविकांवर फुलांचा वर्षाव करण्यात आला. त्यानंतर मुख्यमंत्री पुष्कर धामी यांनी प्रथम दर्शन घेतले. धाममध्ये पंतप्रधान मोदींच्या नावाने पहिली पूजा करण्यात आली.

**मोबाईलचा वापर करण्यास मनाई**

केदारनाथ यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना गाईडलाईन्स जारी करण्यात आली आहे. केदारनाथ मंदिर परिसरात ३० मीटरमध्ये मोबाईलचा वापर करण्यास मनाई आहे.

रिल अथवा फोटो शूट करताना कुणी आढळला तर त्याचा मोबाईल जप्त करण्यात येणार असून ५ हजार रुपये दंडही आकारला जाणार आहे. दरवर्षी हिवाळ्यात होणाऱ्या जोरदार हिमवृष्टीमुळे केदारनाथ मंदिराचे कपाट बंद केले जाते. उन्हाळा सुरू होताच पुन्हा कपाट उघडले जाते.

## नॅशनल हेराल्ड : सोनिया, राहुलसह ६ जणांना कोर्टाची नोटीस

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

नॅशनल हेराल्ड मनी लॉंड्रिंग प्रकरणी दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टाने आज, शुक्रवारी लोकसभेतील विरोधी पक्षनेते, राहुल गांधी आणि काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांना नोटीस बजावली. यासोबतच इतर ६ जणांनादेखील नोटीस देण्यात आली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ८ मे रोजी होणार आहे.

विशेष न्यायाधीश (पीसी कायदा) विशाल गोगणे यांनी सोनिया आणि राहुल गांधींसह सॅम पित्रोदा, सुमन दुबे, सुनील भंडारी, मेसर्स यंग इंडिया आणि मेसर्स डोटेक्स मर्चंडाइज प्रायव्हेट लिमिटेड यांनाही नोटीस बजावली आहे. न्यायाधीश गोगणे म्हणाले की, सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) त्यांच्या आरोपपत्रात ज्यांची नावे दिली आहेत, त्यांना नोटीस बजावताना सुनावणी घेण्याचा अधिकार आहे. नॅशनल हेराल्ड प्रकरण हे काँग्रेस पक्षाने नॅशनल हेराल्डचे मालक असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (एजेएल) यांना ५० लाख रुपयांच्या मोबदल्यात 'यंग इंडियनला दिलेल्या ९० कोटी रुपयांच्या कर्जाशी संबंधित आहे.

एका इक्विटी व्यवहारात २ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या मालमत्तेचा गैरवापर झाल्याचा आरोप आहे. माजी केंद्रीय मंत्री सुब्रमण्यम स्वामी यांनी त्यांच्या खाजगी तक्रारीत सोनिया गांधी, राहुल गांधी, मोतीलाल व्होरा, ऑस्कर फर्नांडिस, सुमन दुबे, सॅम पित्रोदा आणि गांधी कुटुंबाच्या नियंत्रणाखालील यंग इंडियनवर फसवणूक, गुन्हेगारी कट, गुन्हेगारी विश्वासघात आणि मालमत्तेचा गैरवापर केल्याचा आरोप केला होता. ईडीने या वर्षी १५ एप्रिल रोजी गांधी कुटुंबासह काँग्रेस नेते सॅम पित्रोदा आणि इतरांविरुद्ध खटला दाखल केला होता.

## कर्नाटकमध्ये हिंदुत्ववादी नेता सुहास शेट्टीची चाकूने भोसकून केली हत्या

मंगळुरू : कर्नाटकमध्ये हिंदुत्ववादी नेता सुहास शेट्टीची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. ही घटना घडल्यापासून दक्षिण कन्नड जिल्ह्यातील मंगळुरूत तणावाचे वातावरण आहे.

परिस्थितीचा अंदाज येताच कायदा - सुव्यवस्था राखण्यासाठी मंगळुरूतील पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. सुहास शेट्टीची हत्या झाल्यानंतर उल्लालमधील फैझल, कोंचाडीमधील मोहम्मद लुकमान आणि कन्नूरच्या इरशादवर चाकूने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात जखमी झालेल्यांवर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. मंगळुरूचे पोलीस तपास करत आहेत.

सुहास शेट्टी यांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी गुरुवारी रात्री उडुपी तालुक्यातील अथराडी येथे एका मुसलमान तरुणाची हत्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला. हल्लेखोरांनी चालक अबू बक्करच्या ऑटोरिक्षाचा रस्ता अडवला. नंतर हल्लेखोरांनी तलवारी आणि बाटल्यांनी त्याच्यावर हल्ला करण्यास सुरुवात केली. अबू बक्कर पळून गेला आणि हिरियाडका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हिरियाडका पोलीस ठाण्याने तात्काळ कारवाई करत दोघांनाही अटक केली. आरोपी सुशांत आणि संदेश पुजारी यांना अटक करण्यात आली आहे. हे प्रकरण एनआयएकडे सोपवावे अशी मागणी होत आहे.

सुहास शेट्टीच्या हत्येनंतर काही हिंदुत्ववादी संघटनांनी बंद पुकारला आहे. यामुळे मंगळुरूत तणाव आहे. पोलिसांनी बंदोबस्तात वाढ केली आहे.

## लाडक्या बहिणींना लवकरच मिळणार एप्रिलचा हप्ता!

### मंत्री अदिती तटकरे यांनी दिली माहिती

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महायुती सरकारच्या लाडक्या बहिणी आता एप्रिल महिन्याच्या हप्त्याकडे डोळे लावून बसल्या आहेत. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी अक्षय्य तृतीयेच्या औचित्यावर बहिणींच्या खात्यात पैसे जमा होतील, असे जाहीर केले होते. मात्र एप्रिल महिला सरला असून अद्याप महिलांच्या खात्यावर पैसे जमा झालेले नाहीत. यासंदर्भात अदिती तटकरेंनी आता नवी माहिती दिली आहे.



'येत्या २ ते ३ दिवसांत खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात होणार आहे.' मंत्री अदिती तटकरेंनी एक्स हँडलवर ट्विट करत यासंदर्भात माहिती दिली आहे.

ट्विट मध्ये त्यांनी लिहिले की, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' या महत्वाकांक्षी योजनेअंतर्गत एप्रिल म हिन्याचा सन्मान निधी, पात्र लाभार्थी लाडक्या बहिणींच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यांमध्ये जमा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. पुढील २ ते ३ दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होईल आणि सर्व पात्र लाभार्थींना निधी थेट त्यांच्या खात्यात प्राप्त होईल'.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थी महिलांना महिनाअखेरीस २५ तारखेपर्यंत पैसे मिळतात. एप्रिल महिन्यात मात्र पैसे खात्यात जमा झालेले नाहीत. त्यामुळे महिलांना या महिन्याच्या हप्त्याची प्रतीक्षा आहे.

मात्र एप्रिल महिना हा आर्थिक वर्षासुरुवातीचा महिना असल्याने हप्ता जमा होण्यास विलंब झाल्याची माहिती आहे. यातच अदिती तटकरेंनी लवकरच महिलांच्या खात्यात पैसे जमा होणार असल्याची माहिती दिली आहे. त्यामुळे म हिलांची प्रतीक्षा संपणार आहे.

महिला व बालविकास खात्याच्या मंत्री आदिती तटकरे यांच्या माहितीनुसार, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे लाभार्थी २ कोटी ४७ लाख आहेत. त्यांना एप्रिल महिन्याचा हप्ता वितरित केला जाणार आहे.

## महाराष्ट्रासह ११ राज्यांना उष्णतेच्या लाटेपासून नागरिकांचे संरक्षण करण्याचे राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे निर्देश

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

यंदाच्या उन्हाळ्यात उष्णतेच्या लाटेचा धोका लक्षात घेता, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने महाराष्ट्रासह ११ राज्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल, बेघर, वृद्ध, लहान मुले आणि उघड्यावर काम करणाऱ्या कामगारांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. वर्षे २०१८ ते २०२२ या कालावधीत कडक ऊन आणि उष्माघातामुळे देशभरात ३,७९८ मृत्यू झाल्याचे राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्युरो च्या आकडेवारीतून समोर आले. या पार्श्वभूमीवर, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने निवारा, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा आणि कामाच्या वेळांम ध्ये बदल यासारख्या उपाययोजनांवर भर देण्याच्या सूचना आयोगाने केल्या आहेत.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने महाराष्ट्र, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि राजस्थान या राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून उष्णतेच्या लाटेचा सामना करण्यासाठी ठोस पावले उचलण्यास सांगितले आहे.

आयोगाने राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत उष्म्याशी संबंधित आजारांवर उपचार, सार्वजनिक ठिकाणी पंखे, पिण्याचे पाणी, ORS आणि सावलीची व्यवस्था, तसेच कामगारांसाठी संरक्षक कपडे आणि विश्रांतीच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. विशेषत: वसाहती आणि कामगार वस्त्यांमधील कुटुंबांना पंखे, थंड छताचे साहित्य आणि जठड ची पाकिटे देण्यावर भर देण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

आयोगाने राज्यांना विद्यमान मानक कार्यप्रणाली आणि एनडीएमए मार्गदर्शक तत्त्वांनुसार उष्णतेच्या लाटेचा धोका असलेल्या लोकांचे संरक्षण करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल, बेघर आणि उघड्यावर काम करणाऱ्या व्यक्तींवर उष्णतेचा होणारा परिणाम कमी होण्याची अपेक्षा आहे.

## महाराष्ट्र व गुजरात देशाच्या विकास आणि जागतिक पटलावर नाव चमकणारी राज्ये : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

भारताला समृद्ध करणारे भारताचे नाव जागतिक पटलावर येण्यात मोठी भूमिका निभावणारे महत्वाचे राज्य ठरणाऱ्या महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांचा राज्य आज दिवस आहे. या दोन्ही राज्यांना त्यांच्या स्थापना दिवसाच्या शुभेच्छा देत हा प्रवास असाच सुरू राहील, असे प्रतिपादन केंद्रिय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शाह यांनी आज येथे केले.

दिल्लीतील उपराज्यपाल विनय कुमार सक्सेना यांच्या मार्गदर्शनात सायंकाळी दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि केंद्रीय गृहमंत्री श्री. शाह यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांचा राज्य दिवस आज डीडीए असिता ईस्ट पार्क, विकास मार्ग येथे साजरा करण्यात आला. त्यावेळी श्री. शाह बोलत होते. या कार्यक्रमास सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश प्रसन्न वराळे, केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीया, दिल्लीचे तसेच गुजरातचे राज्यमंत्री, महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर विमला, महाराष्ट्र आणि गुजरातचे दिल्ली स्थित विविध क्षेत्रातील निवासी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. केंद्रीय श्री. शाह पुढे म्हणाले, गुजरात व महाराष्ट्र यांनी, कोणताही वाद न घालता, एकाच राज्यातून निर्माण झालेले दोन स्वतंत्र राज्य म्हणून परस्पर सन्मान राखत विकासाच्यादृष्टीने स्पर्धेच्या माध्यमातून देशाच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरले आहे.

पंतप्रधान मोदींनी ङ्गएक भारत, श्रेष्ठ भारतङ्ग या संकल्पनेद्वारे भाषिक व सांस्कृतिक विविधतेतून एकतेचा संदेश दिला असून आज विविध भाषा व संस्कृती एकमेकांना बळ देतात. व्यक्ती मनोमन ठरवले की फ ूट निर्माण करणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा अंत करायचा आहे, तर त्याचे आदर्श उदाहरण मोदींनी ङ्गएक भारत, श्रेष्ठ भारतङ्ग ची कल्पना साकारून दाखवले आहे. महाराष्ट्र, ही वीर छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी, त्यांनी आणि बाजीराव पेशव्यांसारख्या सेनानींनी मुगल सत्तेला जबरदस्त प्रतिकार देत स्वराज्य, स्वधर्म व स्वभाषेचे रक्षण केले. ङ्गस्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहेङ्ग हे लोकमान्य टिळकांनी पुढे नेले.

सामाजिक सुधारणा, भक्ती चळवळ यामध्ये महात्मा फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि वीर सावरकर यांचे योगदान संपूर्ण भारतासाठी प्रेरणादायक ठरले. गुजरात, जेथे श्रीकृष्णांनी जीवन व्यतीत केले, तेथे स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा गांधी व सरदार पटेल यांसारख्या थोर नेत्यांचा जन्म झाला. त्यांनी स्वातंत्र्य चळवळ घडवून आणली.

स्वातंत्र्यानंतर देशाच्या एकात्मतेसाठी व प्रगतीसाठी गुजरात व महाराष्ट्र या राज्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. आज महाराष्ट्रात गरबा तर गुजरातमध्ये गणेशोत्सव उत्साहाने साजरा होतो.

ही परस्पर संस्कृतीची देवाणघेवाण भारताची खरी ताकद आहे. महाराष्ट्र हे देशाची आर्थिक राजधानी असून गुजरातची जीएसडीपी ३० लाख कोटी रुपयांहून अधिक झाली आहे. गुजरातमध्ये देशातील सर्वात मोठा बंदर, रिफायनरी, एशियातील सर्वात मोठा अक्षय ऊर्जा पार्क, पहिली बुलेट ट्रेन, गिफ्ट सिटी आणि आता धोलेरा स्मार्ट सिटी उभी राहत आहे.

वायब्रंट गुजरात आणि मॅग्निफिसंट महाराष्ट्र हे दोन्ही राज्य भारताच्या विकासाचे मजबूत स्तंभ आहेत. दोन्ही राज्यांनी २०४७ पर्यंतचा आपला विकास आराखडा निश्चित केला आहे.

या दोन राज्यांनी आपल्या वारशाचा सन्मान राखत आधुनिकतेला स्वीकारले असून देशाच्या एकात्मतेसाठी मोलाचे योगदान दिले आहे. मोदींनी मांडलेली महान भारताची संकल्पना साकार करण्यासाठी ही राज्ये आरोग्यदायी विकास स्पर्धेच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त करत आहेत. २०४७ मध्ये जेव्हा भारत विकसित राष्ट्र बनेल, तेव्हा गुजरात आणि महाराष्ट्र यांचा सर्वाधिक वाटा असेल.

# एकीकडे उष्णतेची लाट;तर दुसरीकडे पाण्याचा हाहाकार!!

**बदलते** हवामान व उष्णतेची लाट यामुळे धरणातील पाणी साठा दिवसेंदिवस कमी-कमी होतांना दिसत आहे. सध्याच्या परिस्थितीत वाढत्या उष्णतामानामुळे राज्यातील जल साठा आतापासूनच ३८ टक्क्यांवर येवून ठेपला आहे आणि पुढील दोन महिने अजून बाकी आहे त्यामुळे जलसाठ्याची घसरगुंडी अत्यंत चिंताजनक असल्याचे दिसून येते. कारण पुणे, विदर्भ, छत्रपती संभाजीनगर, कोकण, मराठवाडा येथील संपूर्ण मोठ्या धरणांचा जलसाठा झपाट्याने खाली घसरत आहे. एकीकडे तापमानाच्या झळा आणि दुसरीकडे पाणीटंचाई अशा दुहेरी कात्रीत राज्यातील अनेक भागातील नागरिक सापडल्याचे दिसून येते.त्यामुळे आतापासूनच पाण्याचे गांभीर्य लक्षात घेता पाण्याचा अपव्यय टाळून योग्य वापर करण्याची गरज आहे.कारण राज्यातील जलसाठ्याची आकडेवारी पहाली तर अत्यंत गंभीर परिस्थितीत आहे ती याप्रमाणे नागपूर ३९ .२७ टक्के, अमरावती ४८.९६ टक्के, पुणे ३२.७० टक्के, छत्रपती संभाजीनगर ३८.७७ टक्के, नाशिक ४२.६४ टक्के कोकण ४८.४१ अशाप्रकारे प्रमुख शहरातील जलसाठ्याची स्थिती आहे आणि दररोज झपाट्याने साठा कमी-कमी होत आहे यावर सरकारने ताबडतोब गांभीर्याने लक्ष केंद्रित करून उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा पुढील दोन महिन्यांत यापेक्षाही गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही. आज राज्यातच नाही भारतासह संपूर्ण जगात पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.त्यामुळे परिस्थितीनुसार पाण्याचा वापर होणे अत्यंत गरजेचे आहे.आज पाणी टंचाईची सम स्या जगातील इतर अनेक ठिकाणांसारखीच थायलंडमध्येही आहे.मात्र त्यामुळे सण साजरा करण्याच्या उत्साहात अडचण येऊ नये म्हणून फॉगी स्प्रे,ईको-फ्रेंडली वॉटर गन्ससारख्या गोष्टींचा वापर केला जातो.म्हणजे सणाच्या निमित्ताने सुध्दा पाण्याची बचत केली जाते ही बाब थायलंड कृतीतून सिद्ध होते.त्यामुळे भारतात उन्हाळ्यातील पाण्याची गंभीर समस्या पहाता पाण्याचा एक-एक थेंब वाचविणे अत्यंत गरजेचे आहे. आज महाराष्ट्रासह भारतातील अनेक ग्रामीण भागात पाण्याची गंभीर समस्या आहे.कारण आजही ग्रामस्थांनांना पाण्यासाठी ३ ते ४ किलो मिटर अंतरापर्यंत वनवन हिंडावे लागते ही संपूर्ण परिस्थिती बदलते हवामान, जगातील युद्धजन्य परिस्थिती, जंगलतोड, वनवे लागने, ग्लोबल वॉर्मिंग,समुद्राची पातळी वाढने या संपूर्ण गोष्टींमुळे भुजल साठा दिवसेंदिवस कमी होतांना दिसतो.आजही आपण पहातो की वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा होत आहे म्हणजे पाणी समस्ये गंभीर रूप धारण केले असून पुढे चालून आक्राळिवक्राळ रूप धारण करू शकते यालाही नाकारता येत नाही.कारण आजही राज्यासह देशातील अनेक क्षेत्र पाण्याच्या बाबतीत रेड झोनमध्ये असल्याचे सांगितले जाते.कारण संपूर्ण सृष्टी, मनुष्य, संपूर्ण जीवजंतू पाण्याशिवाय जगूच शकत नाही त्यामुळे सरकारने पावसाळ्यात पाणी अडविण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे, पाणी जमीनीच्या पोटात गेले पाहिजे यासाठी युध्दपातळीवर वृक्षलागवड काळाची गरज आहे,औद्योगिकीकरणावर सरकारने लगाम कसली पाहिजे, वाढते शहरीकरण यावरही अंकुश लागायला हवा.कारण निसर्ग सुखरूप रहाला तर सर्वच काही ठीक राहील अन्यथा विनाशकारी प्रक्रिया दिवसेंदिवस वाढतच जाईल म्हणून पाण्याच्या बाबतीत सरकारने सावधगिरीने पाऊल उचलने गरजेचे आहे.वृक्षतोडीची झळ सर्वांनाच भोगावी लागते ही बाब मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कृतीतून सांगितली.

नागपूर शहरात विविध विकास प्रकल्पांसाठी शहरातील अनेक भागांत नागपूर महानगरपालिकेव्दारे वृक्षतोड केली जात आहे.पण बदल्यात वृक्षारोपण मात्र शहराच्या बाहेर केले जात असल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात नोंदविण्यात आले.शहरातील झाडे तोडली जात असल्यास शहराबाहेर वृक्षारोपण काय कामाचे, अशा शब्दात नागपूर खंडपीठाने महापालिकेला खडसावत क्रीडा संकुलासह इतर ठिकाणी प्रस्तावित वृक्षतोडीवर अंतरिम स्थगितीही दिली आहे.१ हजार ३७४ वृक्ष तोडण्याचा प्रस्ताव असून या वृक्षतोडीला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली आहे.या वृक्षतोडीच्या बदल्यात गोरेवाड्यात वृक्षारोपण करणार असल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आली.वृक्षतोड शहरात करायची आणि वृक्षारोपण शहराबाहेर करायचे, हे चालणार नाही असे न्यायालयाने मौखिकपणे नमूद केले. यावरून आपण समजू शकतो की वृक्षतोडीमुळे पाण्यासह जीवनाशी निगडित अनेक गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात.शहरातील वृक्ष तोडायचे आणि शहराबाहेर वृक्षारोपण करायचे याला काय अर्थ?अशा शब्दातही उच्च न्यायालयाने नागपूर महानगरपालिकेला खडसावले.

यावरून लक्षात येते की शहरीकरणाच्या नावाखाली नागपूरसह राज्यातील अनेक भागांत वृक्षांची कत्तल सुरु आहे ही बाब सिद्ध होते आणि आज राज्यात किंवा देशात जी पाण्याची समस्या भेडसावत आहे व पाणी साठा दिवसेंदिवस कमी-कमी होत आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे फक्त वृक्षतोड व जंगलतोड होय.वृक्ष कटाई पाच मिनिटांत होते.परंतु एक वृक्ष लावून मोठे करायला पाच वर्षे लागतात याचे गांभीर्य सरकारने लक्षात ठेवून जलसंपदा टिकवून ठेवण्यासाठी सरकारने सर्वच स्तरातून वृक्षलागवडीवर भर देण्याची गरज आहे.सरकारमार्फत जेवढी झाडे तोडायची असेल त्याच्या दुप्पट वृक्षलागवड सरकारने प्रथम करावी;नंतर वृक्ष तोडण्याचा निर्णय द्यावा. जय हिंद!

# स्वातंत्र्यावरील हल्ल्यांपासून माध्यमांचे रक्षण

**दरवर्षी ३ मे हा दिवस प्रेस स्वातंत्र्याच्या मूलभूत तत्त्वांचा उत्सव साजरा करण्यासाठी, जगभरातील प्रेस स्वातंत्र्याचे मूल्यांकन करण्यासाठी, त्यांच्या स्वातंत्र्यावरील हल्ल्यांपासून माध्यमांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या व्यवसायात प्राण गमावलेल्या पत्रकारांना श्रद्धांजली वाहण्यासाठी साजरा केला जातो. सन १९९१मध्ये युनेस्कोच्या महासभेच्या सव्वीसव्या सत्रात स्वीकारलेल्या शिफारशीनंतर सन १९९३मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने जागतिक प्रेस स्वातंत्र्य दिनाची घोषणा केली. त्यावेळेस ऐतिहासिक विंडहोक घोषणापत्र तयार करणाऱ्या आफ्रिकन पत्रकारांच्या आवाहनाला हा प्रतिसाद होता. पत्रकारितेस प्रेरणादायक असा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर महत्त्वपूर्ण संकलित लेख...संपादक.**

**(३ मे: आंतरराष्ट्रीय पत्रकार स्वातंत्र्य दिन विशेष)**

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटल्या जार्णाया प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य अत्यंत महत्त्वाचे आहे. माध्यमे मुक्त असतील तरच ते आपले काम चोख बजावू शकतील. सत्य समोर आणण्यासाठी आणि आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी मीडियावाले आपला जीवही गमावतात. माध्यमांच्या स्वातंत्र्यावर आणि सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उभे असताना अशी उदाहरणे रोज आपल्यासमोर येतात. कधी स्पष्टवक्ते म्हणून तर कधी मोठे घोटाळे उघडकीस आणण्यासाठी, अनेकदा माध्यमांना आपले कर्तव्य बजावण्याचा फटका सहन करावा लागतो. प्रसारमाध्यमांतील पत्रकारांना अभिवादन करण्यासाठी दरवर्षी ३ मे रोजी जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिन साजरा केला जातो जेणेकरून प्रत्येकाला प्रेस स्वातंत्र्याचे महत्त्व सांगितले जाऊ शकते आणि विचार स्वातंत्र्याचा अधिकार प्रस्थापित करता येईल. यासोबतच आपली जबाबदारी पार पाडताना प्राण गमावलेल्या पत्रकार आणि प्रसारमाध्यमांचे या दिवशी स्मरण केले जाते.

सन १९९३मध्ये ३ मे हा दिवस पत्रकार स्वातंत्र्य दिन म्हणून घोषित करण्यात आला होता. युनेस्कोने २६व्या सर्वसाधारण परिषदेत ३ मे हा प्रेस स्वातंत्र्य दिन म्हणून घोषित केला. दरवर्षी पत्रकार स्वातंत्र्य दिन एका थीमसह साजरा केला जातो या थीमद्वारे डिजिटल मीडियावरील जनतेचा विश्वास आणि या सर्वांच्या परिणामांवरही प्रकाश टाकण्यात येतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा मूलभूत अधिकार आहे आणि जगभरातील घडामोडींची माहिती जनतेला देण्यात प्रेस महत्त्वाची भूमिका बजावते. ग्लोबल कॉन्फरन्स पत्रकार, नागरी समाजाचे प्रतिनिधी आणि राष्ट्रीय अधिकारी यांना उपाय शोधण्यासाठी एकत्र काम करण्याची संधी देते. सन १९४८मध्ये मानवी हक्कांच्या सार्वत्रिक जाहीरनाम्याच्या कलम १९मध्ये प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे, प्रत्येकाला आपले मत निर्भयपणे व्यक्त करण्याचा अधिकार आहे आणि प्रत्येकाला आपले मत व्यक्त करण्यासाठी प्रेसचा वापर करण्याचा अधिकार आहे, यावर भर देण्यात आला आहे. जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिन दरवर्षी ३ मे रोजी साजरा केला जातो. हा दिवस प्रेस स्वातंत्र्याचे महत्त्व आणि लोकशाही, पारदर्शकता, आणि मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी पत्रकारितेच्या भूमिकेची आठवण करून देतो.



– संकलन व शब्दांकन –
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा- ७७७५०४१०८६.

जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व: प्रेस स्वातंत्र्य- प्रेस स्वातंत्र्य म्हणजे लोकांना सत्य माहिती मिळवण्याचा आणि व्यक्त करण्याचा अधिकार आहे. लोकशाही- पत्रकारितेमुळे लोकांना सरकार आणि इतर संस्था यांच्याबद्दल माहिती मिळते, ज्यामुळे लोकशाही मजबूत होते. पारदर्शकता- पत्रकारिता लोकांना सरकार आणि इतर संस्था यांच्या कामांबद्दल माहिती मिळवण्यास मदत करते, ज्यामुळे पारदर्शकता वाढते. मानवाधिकार- पत्रकारिता मानवाधिकार आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यास मदत करते. जनजागृती- हा दिवस पत्रकारांना आणि सामान्य लोकांना प्रेस स्वातंत्र्याच्या आव्हानांबद्दल जागरूक करतो. सुरक्षितता- हा दिवस पत्रकारांना त्यांच्या कामात येणाऱ्या अडचणी आणि धोक्यांबद्दल जागरूकता वाढवतो.

जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनाची सुरुवात: संयुक्त राष्ट्र महासभेने १९९३मध्ये हा दिवस जागतिक स्तरावर साजरा करण्याचा निर्णय घेतला. ३ मे रोजी हा दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली.

जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनाची थीम- दरवर्षी, जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनासाठी एक विशिष्ट थीम निवडली जाते, जी प्रेस स्वातंत्र्याच्या वेगवेगळ्या पैलूंवर लक्ष केंद्रित करते. निष्कर्ष: जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिन प्रेस स्वातंत्र्याचे महत्त्व अधोरेखित करतो आणि पत्रकारांना त्यांच्या कामात येणाऱ्या अडचणी आणि आव्हानांबद्दल जागरूकता वाढवतो. हा दिवस लोकशाही, पारदर्शकता आणि मानवाधिकार यांसारख्या मूल्यांचा आधार आहे. (विविध प्रसार माध्यमांवरून साभार.)

!! विश्व पत्रकारिता स्वातंत्र्य दिनाच्या सर्व पत्रकार बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

# भारतात यापूर्वी कधी झाली होती जात विचारून जनगणना? जाणून घ्या काय होते आकडे आणि त्याचे महत्व

केंद्र सरकारने येत्या जनगणनेत जातीचादेखील समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ३० एप्रिल (बुधवार) रोजी सांगितले की, आगामी जनगणनेत जातीचा देखील 'पारदर्शक' पद्धतीने समावेश केला जाईल. राजकीय बाबींवरील मंत्रिमंडळ समितीने घेतलेल्या निर्णयांची घोषणा करताना देशाचे रेल्वे आणि माहिती तसेच तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, जनगणना केंद्राच्या आखत्यारीत येते, परंतु काही राज्यांनी सर्वेक्षणाच्या नावाखाली जातींची गणना केलेली आहे.

वैष्णव यांनी आरोप केला आहे, की विरोधी पक्षांनी शासित राज्यांनी राजकीय कारणांसाठी जातीवर आधारित सर्वेक्षण केले. ते म्हणाले की, मोदी सरकार येत्या अखिल भारतीय जनगणना प्रक्रियेत पारदर्शक पद्धतीने जात मोजणी करण्यासाठी कटिबद्ध आहे.

दर १० वर्षांनी होते जनगणना

भारतात दर १० वर्षांनी जनगणना केली जाते, त्यानुसार एप्रिल २०२० मध्ये सुरू होणारी जनगणना कोविड महाम ारीमुळे पुढे ढकलण्यात आली होती. जी लवकरच होण्याची शक्यता आहे. मात्र या दरम्यानच्या जनगणनेत जात देखील विचारली जाईल. यापूर्वी १९३१ च्या जनगणनेत जातीचा समावेश करण्यात आला होता. त्यानंतर भारतात ९६ वर्षांनंतर जातीय जनगणना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

देशात दोनदा जात विचारून जनगणना झाली

देशात आतापर्यंत दोनदा जात विचारून जनगणना करण्यात आली आहे. १९०१ मध्ये पहिल्यांदाच हे घडले. त्यानंतर १९३१ च्या जनगणनेत जातीचा समावेश करण्यात आला. यावरून देशाच्या सामाजिक रचनेबद्दल महत्त्वाची माहिती मिळते. १९३१ च्या जनगणनेतच असे दिसून आले की त्यावेळी देशाची लोकसंख्या २७ कोटी होती आणि त्यातील ५२ टक्के लोक इतर मागासवर्गीय वर्गात समाविष्ट असलेल्या जाती होत्या. या आधारावर, १९८० मध्ये मंडल आयोगाने सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये ओबीसींसाठी २७% आरक्षणाची शिफारस केली, जी १९९० मध्ये लागू करण्यात आली.

जात जनगणनेचे महत्व

जात जनगणनेत, देशातील प्रत्येक व्यक्तीचे नाव, लिंग, शिक्षण, आर्थिक स्थिती यासह जातीचा डेटा देखील गोळा केला जातो. भारतात, लोकांच्या शिक्षणात, रोजगारात आणि सामाजिक प्रवेशात जात महत्त्वाची भूमिका बजावते. प्रत्येक जातीच्या लोकांच्या लोकसंख्येची स्पष्ट कल्पना असल्यास, सरकार चांगल्या रणनीती बनवू शकतात. यामुळे सामाजिक समानता वाढवण्यासाठी प्रभावी पावले उचलता येऊ शकतात. आरक्षण आणि सार्वजनिक कल्याणकारी धोरणे तयार करण्यात जनगणनेतील जातीचा डेटा महत्त्वाची भूमिका बजावू शकतो.

नेहरू सरकारने जनगणनेतून जात का वगळली?

देशाच्या स्वातंत्र्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालील सरकारने जनगणनेतून जात वगळण्याचा निर्णय घेतला होता. यामुळे राष्ट्रीय एकता कमकुवत होईल आणि देशाच्या सामाजिक विविधतेमुळे समाजात फूट पडू शकते, असे त्यांचे मत होते. त्यानंतरच्या सरकारांनी जाती-आधारित ओळख कमी करणे आणि राष्ट्रीय ओळख मजबूत करणे हे उद्दिष्ट ठेवले. या कारणास्तव, जवळजवळ एक शतक जनगणनेत जातीचा समावेश करण्यात आला नाही.

# जैसलमेरमधून पाकच्या गुप्तहेराला अटक

नवी दिल्ली, दि. ३ (वृत्तसंस्था) - राजस्थानमधील जैसलमेरम धून पाकिस्तानच्या गुप्तहेराला अटक करण्यात आली आहे. पठाण खान असे या गुप्तहेराचे नाव आहे. तो भारताशी संबंधित महत्त्वाची माहिती पाकिस्तानला पुरवत होता. पठाण खान हा आयएसआय या पाकिस्तानच्या गुप्तहेर संघटनेसाठी काम करत होता.

राजस्थानमध्ये इंटेलिजन्सच्या पथकाने महिन्याभरापूर्वी पठाण खान याला अटक केली. त्याची महिनाभर चौकशी सुरू होती. आता त्याच्या विरुद्ध १९२३ च्या अधिकृत गुपिते कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पठाण खान याला १ मे २०२५ रोजी गुन्हा नोंदवून औपचारिक अटक करण्यात आली. हाती आलेल्या माहितीनुसार, पठाण खान पहिल्यांदा २०१३ मध्ये पाकिस्तानमध्ये हेरगिरीच्या प्रशिक्षणासाठी गेला होता. यानंतरही अधूनमधून तो पाकिस्तानमध्ये जाऊन आला आहे. पठाण खानने अनेकदा भारताशी संबंधित महत्त्वाची माहिती पाकिस्तानला पुरवली आहे. पठाणने नेमकी कोणकोणती माहिती पाकिस्तानला दिली आहे. या माहितीचा पाकिस्तानकडून गैरवापर होऊ नये म्हणून काय काळजी घ्यायची याबाबतचे नियोजन सध्या सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार पठाण खानला पाकिस्तानकडून वेगवेगळ्या मार्गाने हेरगिरीसाठी पैसा दिला जात होता. पाकिस्ताकडून सलग आठव्या रात्री शस्त्रसंधीचे उल्लंघन पाकिस्तानने सलग आठव्या रात्री शस्त्रसंधीचे उल्लंघन करुन भारताच्या चौकी - पहारे यांना लक्ष्य करुन गोळीबार केला. भारताने पाकिस्तानच्या गोळीबााला चोख प्रत्युत्तर दिले. जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी २६ नागरिकांची हत्या केली. या अतिरेकी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला आहे. तणाव वाढू लागल्यापासून सातत्याने पाकिस्तान शस्त्रसंधीचे उल्लंघन करत आहे आणि भारताकडून त्याला प्रत्युत्तर दिले जात आहे. पाकिस्तानने लहान शस्त्रांद्वारे कुपवाडा, बारामुला, पूँछ, नौशेरा, अखनूरमध्ये भारताच्या चौकी - पहाऱ्यांना लक्ष्य करुन गोळीबार केला. भारत - पाकिस्तान सीमेवर गोळीबार सुरू असल्याम ुळे दररोज कित्येक तास स्थानिकांना बंकरमध्येच वास्तव्य करावे लागत आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी सरकारी योजनेत सीमेजवळच्या शेकडो गावांमध्ये दर्जेदार बंकर बांधण्यात आले आहेत. या बंकरमध्ये नागरिक सुरक्षित आहेत. आंतरराष्ट्रीय सीमेवरील आरएस पुरा आणि अर्निया सेक्टरमध्ये पिकांची कापणी पूर्ण झाली असली तरी, कठुआ, सांबा, राजौरी आणि पूंछ जिल्ह्यांमध्ये अजूनही सुरू आहे. पठाणकोट हल्ल्यानंतर भारताने सिंधू नदी पाणी वाटप करार स्थगित केला आहे.

# अखिल भारतीय सिनेमा दंतकथा नाही; चित्रपट उद्योगातील दिग्गजांचा भारतीय चित्रपटातील एकतेवर भर

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर इथे सुरू असलेल्या सुरू असलेल्या जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषदेत (थअतएड २०२५) आज अखिल भारतीय चित्रपट : दंतकथा आथवा चालना असलेले वास्तव या विषयावर निमंत्रितांचे प्रेरणादायी चर्चासत्र झाले.

नमन रामचंद्रन यांनी या सत्राचे सूत्रसंचालक म्हणून भूमिका पार पाडली. यासोबतच नागार्जुन, अनुपम खेर, कार्ती आणि खुशबू सुंदर असे भारतीय चित्रपट उद्योग क्षेत्रातील चार मान्यवर या चर्चासत्रात सहभागी झाले. या सर्वांनी उपस्थितांना गुंतवून ठेवणारा संवाद साधला.

चित्रपटाची ताकद ही त्यातल्या भावनिक संदर्भांशी जोडलेली असते याचे स्मरण खुशबू सुंदर यांनी श्रोत्यांना करून दिले. भारतातील चित्रपट हे सर्व भारतीयांना आपलेसे वाटावेत, अशा उद्देशानेच तयार केले जातात, त्यामुळेच बॉलीवूड आणि प्रादेशिक चित्रपट उद्योगक्षेत्रात कोणताही भेदभाव केला जाऊ नये, ही बाब त्यांनी ठामपणे अधोरेखित केली. ज्यावेळी तुम्ही आपल्या परस्पर सामायिक संस्कृती, आपली गाणी, आपल्या कथा, आपल्या मातीचा आदर करतात, त्यावेळी तो चित्रपट प्रादेशिक किंवा राष्ट्रीय न राहता 'भारतीय' चित्रपट बनतो. यातूनच सर्व गोष्टींचे मूळ एकाच ठिकाणी असल्याचीही जाणिव आपल्याला होते, असे निरीक्षणही त्यांनी मांडले.

नागार्जुन यांनीही अशीच भावना व्यक्त केली. त्यांनी आपल्या मनोगत आणि विचारांतून भारतातील चित्रपट निर्मितीच्या परंपरांना एकत्र जोडणाऱ्या समृद्ध सांस्कृतिक विविधतेचा गौरव केला. कथात्मक मांडणीच्या क्षेत्रातील कलाकारांना प्रेरणा देणाऱ्या असंख्य भाषा, चालीरीती आणि भूप्रदेशांबद्दलची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

आपल्या मूळ जे आहे, त्याचा अभिमान बाळगल्याने सर्जनशीलतेला कुठेही मर्यादा येत नाहीत, तर त्याउलट यामुळे सर्जनशीलता अधिक मुक्त होत असते, याचे स्मरण त्यांनी उपस्थितांना करून दिले. हेच भारतीय चित्रपटांचे खरे सार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

अनुपम खेर यांनी कोविड-१९ साथीमुळे सिनेमा पाहण्याच्या पद्धतीत झालेल्या बदलाबद्दल सांगितले. प्रेक्षक चित्रपट पाहण्यासाठी वेगवेगळे स्रोत वापरू लागले, विविध प्रदेशांमधील नव्हे, तर केवळ भारतातील चित्रपट पाहण्याकडे प्रेक्षकांचा कल वाढल्याचे ते म्हणाले. आपल्या कलेच्या सादरीकरणात प्रामाणिकपणा असणे गरजेचे आहे यावर त्यांनी भर दिला. 'तुम्ही एखाद्या पौराणिक कथेचे मोठ्या पडद्यावर प्रसारण करत असाल किंवा एखादे नाटक दाखवत असाल, तरी कथाकथनातील प्रामाणिकपणाची कधीच तुम्ही साथ सोडता कामा नाही. प्रेक्षकांना नाट्यमयता आवडते, तरीही कथाकथनातील सच्चेपणाला ते नेहमीच दाद देतात आणि चित्रपटात हीच गोष्ट सर्वात प्रभावी ठरते,' असे ते म्हणाले.

याच मुद्द्यावर कार्ती म्हणाले की, प्रेक्षकांना 'लार्जर दॅन लाईफ' अनुभवाचे नेहमीच आकर्षण असते. प्रेक्षकांना आज वैविध्यपूर्ण आशय सहज उपलब्ध असूनही, गाणी, नृत्याची जादू, आणि शौर्यगाथा पाहण्यासाठी ते आजही चित्रपटगृहात गर्दी करतात.

या चर्चासत्रात सहभागी झालेल्या वक्त्यांनी 'प्रादेशिक' चित्रपटांच्या कल्पने पलीकडे जाऊन 'भारतीय चित्रपट' ही संकल्पना आत्मसात करण्याचे महत्त्व विषद केले. भावना आणि प्रामाणिकपणाचे महत्व अधोरेखित करून, भारतीय सिनेमाची खरी ताकद विभाजनात नसून, आपल्या मातीत रुजलेल्या एकतेत आहे, आणि हाच वेग भारतीय सिनेमाला पुढे घेऊन जाईल, असे अधोरेखित केले.

# पाणीपुरवठा योजनेत अडथडा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध सक्त कारवाई

## पोलीस आयुक्त व मनपा प्रशासक यांचा इशारा



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

नवीन पाणीपुरवठा योजनेच्या कामात जे कोणी अडकाठी आणतील त्याला सोडणार नाही, त्याच्या विरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे प्रतिपादन आज पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी आज छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका आयुक्तता प्रशासक जी श्रीकांत यांच्या सोबत घेण्यात आलेली एक संयुक्त बैठकीत केले.

आज संध्याकाळी पोलीस मुख्याल य येथे पोलीस आयुक्त पवार यांनी नवीन पाणीपुरवठा योजना चे काम करणारे गुत्तेदार, संबंधित अधिकारी यांची बैठक घेतली.

या बैठकीत वर नमूद दोन्ही सनदी अधिकाऱ्यांनी ताकीद दिली की पाणीपुरवठा योजनेच्या कामात जे कोणी कोणत्याही स्वरूपाची अडचण आणतील त्याच्याविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी. पोलीस आयुक्त म्हणाले की जर कोणी कोणत्याही प्रकारचे कारणास्तव योजनेच्या कामात वाद घालतील किंवा काम थांबविण्यासाठी हिंसाचाराचा अवलंब करतील, त्यांना सोडला जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सदरील योजना माननीय उच्च न्यायालय यांच्या सूचनाप्रमाणे अविरत चालू राहील याची सर्वांनी नोंद घ्यावी, ते म्हणाले. जर कोणी कोणत्याही कारणास्तव कामात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करून दिसला तर याची तक्रार संबंधित पोलीसकडे करावी, अशी सूचना त्यांनी गुत्तेदारांना यावेळी केली.

यावेळी प्रशासक जी श्रीकांत म्हणाले की संपूर्ण देशात फक्त तीन योजना अशी आहे ज्याची मॉनिटरिंग थेट पंतप्रधान यांचे कार्यालय मार्फत केली जात आहे. याच्यात कोयंबतूर, जगन्नाथ पुरी आणि छत्रपती संभाजीनगर मध्ये नवीन पाणीपुरवठा योजना यांचा समावेश आहे. सदरील योजना अतिशय महत्त्वकांक्षी असून कोणीही या योजनेत अडथळा आणू नये, अन्यथा त्यांच्या विरोधात सक्त कायदेशीर कारवाई करण्यात येईल. ते पुढे म्हणाले की पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्णता कडे वळत आहे, आता एक ते दोन किलोमीटर लाईन टाकण्याचे काम बाकी आहे. सदरील योजना पूर्ण होईपर्यंत कोणीही कायदा हातात घेऊ नये जर काही वाद झाला तर त्यांनी तो वाद कायदेशीर मार्गाने सोडवावे, ते म्हणाले.

# ‘लाडकी बहीण’मुळे २०२७ पर्यंत कोणतेही काम होणार नाही; काँग्रेस नेत्याचा दावा

**जालना**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे सरकारी तिजोरीवर ताण पडत असल्याची चर्चा सुरू आहे. तसेच राज्यात झालेल्या पीकविमा घोटाळ्यावरून काँग्रेसचे नेते आणि माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी महायुती सरकारवर हल्लाबोल केला आहे. पीकविमा बोगस योजना बोगस असून हे फार मोठे रॅकेट आहे, अशी टीका कैलास गोरंट्याल यांनी केली आहे. तसेच लाडकी बहीण योजनेमुळे २०२७ पर्यंत कोणतेही काम येणार नाही, आणि होणारही नाही, असा दावाही गोरंट्याल यांनी केला.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री माझी ल ाडकी बहीण योजना आणली होती. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना महिन्याला दीड हजार रुपयांचे मानधन दिले जाते. मात्र या योजनेमुळे सरकारी तिजोरीवर ताण पडत असल्याची चर्चा आहे. तसेच सरकार इतर योजनांचा पैसा हा लाडकी बहीण योजनेकडे वळवत असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. या सर्व पार्श्वभूमीवर कैलास गोरंट्याल यांनी सरकारवर निशाणा साधला आहे. पीकविमा योजनेबाबत कैलास गोरंट्याल म्हणाले की, पीकविमा बोगस आहे. पीकविमा योजनेमध्ये गैरप्रकार झाल्याचे मी अधिवेशनामध्ये सुद्धा बोललो होतो. ज्या माणसाला शेती नाही त्याला पैसे भेटतात आणि ज्याला खरी शेती आहे त्याला काहीच भेटत नाही. हे फार मोठे रॅ केट आहे. एक रुपयात पीकविमा ही तर फसवी योजना होती.

लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना कैलास गोरंट्याल यांनी मोठा दावा केला आहे. लाडकी बहीण योजनेमुळे तर २०२७ पर्यंत कोणतेही काम येणार नाही आणि होणारही नाही, असे गोरंट्याल म्हणालेत. मी पोलिस खात्यातल्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यासोबत बोललो, तर मला अशी शंका यायला लागली, आमचे पगार पण येतात की नाही.

एसटी महामंडळाच्या लोकांचे अर्धे पगार भेटलेच नाही अशी अवस्था सध्या आहे, असेही गोरंट्याल म्हणाले. त्यामुळे या सर्व फसव्या योजना आहेत आणि यामुळे सर्व काही त्यांच्या अंगावर येणार आहे. त्यामुळे याला जबाबदार त्यावेळचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हेच आहेत असा आरोप कैलास गोरंट्याल यांनी केला आहे.

# विभागीय आयुक्त दिलीप गावडे साधणार विभागातील दिव्यांगांशी संवाद

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मराठवाडा विभागातील गरजू दिव्यांग यांच्या आज पर्यंत प्रलबिंत असलेल्या मागण्या सोडविण्यासाठी शासन निर्णयाच्या अधिन राहून व दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ बाबत विभागीय आयुक्त दिलीप गावडे हे विभागातील दिव्यांगाशी ७ मे २०२५ रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत ऑनलाईन वेबिनारद्वारे थेट संवाद साधणार आहे. तरी विभागातील दिव्यांगांनी संवादात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# चित्रतपस्वी भालजी पेंढारकर !!

**(भालजी पेंढारकर जयंती विशेष.)**

**भालचंद्र पेंढारकर अर्थात अण्णा हे अत्यंत व्यासंगी, शिस्तबद्ध आणि रंगभूमीवर अमाप श्रद्धा असणारे रंगकर्मी होते. तिसरी घंटा जाहीर केलेल्या वेळेवरच देणारे आणि त्याच क्षणी बुकिंगची पर्वा न करता नाटक सुरू करणारे एकमेव निर्माता आणि अभिनेते होते. मुंबई साहित्य संघात त्यांची स्वत:ची रेकॉर्डिंग रूम होती. त्यात त्यांनी असंख्य नाटके रेकॉर्ड करून ठेवलेली आहेत.. त्यांत प्रायोगिक नाटके, संघात झालेल्या प्रत्येक नवीन प्रयोगाचे ध्वनिमुद्रण त्यांनी केले होते. अधिक रोचक, उपयोगी संकलित माहिती श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर लेखात वाचा.... संपादक.**

भालजी पेंढारकर हे भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया घालर्णाया चित्रकर्मींमधले अग्रणी चित्रपट दिग्दर्शक, निर्माते, पटकथालेखक, संवादलेखक आणि गीतकार होते. भालजींचा जन्म दि.२ मे १८९८ रोजी कोल्हापूर संस्थानचे तत्कालीन सहायक शल्यचिकित्सक डॉ.गोपाळराव आणि राधाबाई पेंढारकर यांच्यापोटी कोल्हापुरात झाला. निर्माते-अभिनेते बाबूराव पेंढारकर हे त्यांचे ज्येष्ठ बंधू. चाकोरीबद्ध शालेय शिक्षणात मन न रमलेल्या भालजींनी तरुणवयातच कोल्हापूर सोडले. सुरुवातीच्या काळात पुण्यात केसरी या वृत्तपत्रात नोकरी, छत्रपती शाहूमहाराजांच्या रायबाग कॅम्पमध्ये वास्तव्य आणि सैन्यात भरती काहीशी अशी भटकंती करत ते कोल्हापूरला परतले. भालजी पुण्यात असताना त्यांनी केसरीचे अंक घरोघरी पोहोचवणे, विकणे अशी कामे केली; पण त्यातून उरलेल्या वेळात त्यांनी केसरीचे जुने अंक-विशेषत: लोकमान्य टिळकांचे जहाल अग्रलेख, चिपळूणकर, मोडक, विजापूरकरांच्या ग्रंथमाला, पुस्तके, चरित्रे असे साहित्य वाचले. त्यांच्यातल्या लेखकावर या सगळ्यांचे संस्कार झाले. पुण्यातल्या लक्ष्मी थिएटरचे व्यवस्थापक रुस्तमजी मोदी (सोहराब मोदींचे बंधू) यांनी त्या काळी मूकपटांच्या वरच्या भागात इंग्रजी उपशीर्षकांची मराठी भाषांतरे देण्याची पद्धत सुरू केली होती. भालजींना वर्तमानपत्रात स्फ ुटे लिहिण्याबरोबरच हे मराठी भाषांतराचे कामही मि ळाले. पुढे त्यांनी सिनेमा समाचारमधून चित्रपटांची परीक्षणेही लिहिली. १९२१ मध्ये भालजींनी संगीत कायदेभंग, भवितव्यता, क्रांतिकारक, राष्ट्रसंसार, आसुरी लालसा आणि अजिंक्यतारा ही सहा नाटके लिहिली, त्यांत अभिनयही केला.

भारताला स्वातंत्र्य मिळाले होते. गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त झाल्याच्या भावनेचा व स्वातंत्र्याचा दिव्य संदेश भालजींनी आपल्या चित्रपटांतून दिला. बहिर्जी नाईक, नेताजी पालकर, मोहित्यांची मंजुळा यांतील संवादांमधून भालजींनी दुबळेपणा व लाचारीविरुद्ध शाद्बिक आसूड ओढले. स्वातंत्र्य मिळाले तरी सुराज्य निर्माण करण्यासाठी त्याग, निष्ठा, औदार्य व संयमी असा खंबीरपणा आणि आत्मविश्वास असलेली तरुण पिढी तयार व्हावी यासाठी त्यांनी समृद्ध आशयासह कला व तंत्र या दोन्ही दृष्टिकोनातून उत्कृष्ट अशा चित्रपटांची निर्मिती केली. भालजींचे चित्रपट किंवा त्यांची निर्मिती संस्था म्हणजे कलाकार व तंत्रज्ञ घडवणारी एक मोठी कार्यशाळाच होती. तसेच त्यांचा संच म्हणजे कुटुंबच होते. शिस्तबद्धता, वेळापत्रकानुसार काम, कामांचे नेटके वाटप, स्तोत्रपठण, प्रार्थना, रेखीव दिनक्रम, वगैरे... चित्रपटाच्या माध्यमातून भालजींनी सुलोचनादीदी, चंद्रकांत मांडरे, सूर्यकांत मांडरे, जयश्री गडकर असे असंख्य कलाकार घडवले. शिवाजीचा काळ आणि त्या काळातील व्यक्तिरेखा व प्रसंग ही भालजींच्या चित्रपटांची प्रमुख वैशिष्ट्ये होती. त्यांच्या युगप्रवर्तक अशा कारकिर्दीमुळे भालजींना यथार्थतेने चित्रतपस्वी असे म्हटले जाते. सन १९४८मध्ये गांधीजींची हत्या झाल्यानंतरच्या दंगलीमध्ये भालजींचा कोल्हापूर येथील जयप्रभा स्टुडिओ जाळला गेला. नुकताच तयार झालेला मीठभाकर व बाळ गजबरांचा मेरे लाल हे चित्रपट आगीत भक्षस्थानी पडले. दीडशे ते दोनशे कामगार बेकार झाले. भालजींनी पुन्हा लाखो रुपये खर्चून जयप्रभास परत उभे केले. जिद्दीतून मीठभाकर व मेरे लालची पुनर्निर्मिती केली. मीठभाकरने चांगला व्यवसाय केला. भालजींनी कोल्हापुरात मराठी चित्रनिर्मितीस पुन्हा एकदा वेग मिळवून दिला. भालजी पेंढारकरांच्या बोलपटांच्या सुरुवातीलाच बहु असोत सुंदर, आकाशवाणी, पार्थकुमार, कालियामर्दन, सावित्री अशी सुरू झालेली त्यांची कारकीर्द नेताजी पालकर, थोरातांची कमळा, वाल्मिकी, मीठभाकर, छत्रपती शिवाजी, गाठ पडली ठका ठका, मोहित्यांची मंजुळा अशी वळणे घेत गेली. साधी माणसं, गनिमी कावा आणि शेवटचा शाब्बास सूनबाई असे तब्बल पंचेचाळीस चित्रपट त्यांनी चित्रपटसृष्टीला दिले. या चित्रपटांत ते दिग्दर्शन, कथा, पटकथा, संवाद किंवा निर्मिती या नात्याने कार्यरत होते. अशा या श्रेष्ठ चित्रमहर्षींचे- भालजींचे कोल्हापूर येथे दि.२६ नोव्हेंबर १९९४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या युगप्रवर्तक अशा कारकिर्दीमुळे भालजींना यथार्थतेने चित्रतपस्वी असे म्हटले जाते. भारतीय चित्रपटसृष्टीच्या अप्रगत अशा कालखंडात मूकपटापासून सुरुवात करत उत्तम ेत्तम बोलपट निर्माण करून चित्रपटसृष्टीचा भक्कम पाया घालणारे सर्जनशील, प्रयोगशील चित्रपटकर्मी म्हणून त्यांचे नाव भारतीय कलेच्या इतिहासात कायमचे नोंदले गेले आहे.

!! चित्रतपस्वी भालजी पेंढारकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !!

- संकलन व सुलेखन -
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली, जि. गडचिरोली.
फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.

# आनंदजी कल्याणजी जैन मंदिर ट्रस्टतर्फे त्रिदिवसीय वर्षीतप पारना महोत्सवची सांगता



छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजीनगर प्रवर समिति कार्यवाहक, महा मांगलिक प्रदाता,संघ उपकारी गच्छाधीपति प.पु.ग.आ.भ. श्रीमद विजय अभयदेवसूरीजी महाराजा,मार्गदर्शक प.पु. आ.भ. श्रीमद,मोक्षरत्नसुरिश्वरजी म.सा.च्या आशिर्वादाने प.पू.सा.श्री.अक्रेंदुश्रीजी म.सा.,प.पू.सा.श्री.मुक्तिरसाश्रीजी म.सा., प.पू.सा.श्री. शासनज्योतिश्रीजी म.सा. यांच्या सानिध्यात वर्षीतप पारना त्रिदिवसीय महोत्सव संपन्न. विम लनाथ मंदिर येथुन पूज्य गुरु भगवंत वब वर्षीतप तपस्वींची शोभा यात्रा श्री गोडिजी पार्श्वनाथ जैन मंदिर पर्यंत काढण्यात आली. पश्यात श्री आदिनाथ प्रभु पंचकल्याणक पूजा महिला मंडल तर्फे करण्यात आली. तदनतर दि.२९. सकाळी ०८.३० वा. शिर धर्मेन्द्रभाई पंडित ( मुंबई ) यानी तपवंदानावली हा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाचा लाभ मातोश्री प्यारी बेन गणेशमल लुंकड़ परिवाराने घेतला.

दु.१२.३० वा. श्री सिध्द चक्र महापूजन चे आयोजन मोमाया परिवारा तर्फे करण्यात आले होते. या प्रसंगी विधिकार राजुभाई शाह ( म लकापुर ), संगीतकार - दर्शित गादीया व शेकडो भाविक उपस्थित होते.

अक्षय तृतीया दि. ३० बुधवार रोजी सकाळी ७.०० वा. श्री आदिनाथ भगवंताची अभिषेक, पूजा, आरती करण्यात आली ७.३० वा. नवकारशी स.८.३० वा. श्री अभयमुक्ति एक्टिव ग्रुप तर्फे संस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात ग्रुप च्या ५० सदस्यांनी अदीनाथ भगवंताचा पारना प्रंसग प्रस्तुत केली. सकाळी १०.०० वा. प.पू.सा.श्री. मुक्तिरसाश्रीजी म.सा. च्या प्रशिष्या, प.पू.सा.श्री. परमार्थरसाश्रीजी म.सा. व प.पू.सा.श्री. तत्वार्थप्रियाश्रीजी म.सा. तसेच सुश्रावक हर्षल अनिल मोमाया, सुश्राविका श्रीमती सरोज बेन, सौ.अर्चना बेन नरेन्द्र गेलडा, सारिका बेन प्रशांतभाई बोरा यांचा वर्षीतप पारना करवण्यात आला

या कार्यक्रमात श्री श्रेयांश कुमार बनुन मातोश्री लीलावती बेन जेठाबाई मोमाया, श्री चंद्रबेन गुलाबचंद खोना, शौर्य, निशांत, लीना, यश तथा लोढाया परिवार तपस्विना पारना करवण्याचा म ान मीळवला. श्री गुरुपूजन चा मान एक सदग्रस्त परिवार हस्ते रमेश भाई मनमंदिर परिवाराने म ीळवला. तसेच गुरु भगवंताना शाल ओढ़वन्याचा मान श्री डॉ.उमेशकुमार रूपचंद तातेड परिवाराने श्री.पु.सा.श्री एवं तपस्विना अक्षतने स्वागत करण्याचा मान मातोश्री लीलावती बेन जेठाबाई म ोमाया श्री चंद्रबेन गुलाबचंद खोना, शौर्य, निशांत, लीना, यश तथा लोढाया परिवार मीळवला. तपस्विचा बहुमान करण्याचा मान मातोश्री सुशीला देवी चैनकरन संचेती परिवाराणे मीळवला

११.३० ते २.०० वाजे पर्यंत महाप्रसादी दु ३.०० वाजता तपस्वीची सांजी ( भावगीत ) सह कार्यक्रम म.सा.च्या सांसारिक परिवारा तर्फे संपन्न करण्यात आला. उपरोक्त कार्यक्रमास मंत्री अतुल सावे, अनिल मक्रीये, विनोद लोडाया, निलेश बाबरीया, डॉ.जिन्दानी, महेंद्र जैन, राहुल डोसी, आनंद संचेती, डॉ तातेड, रवि मुगदीया, शांतिकाका, हंसमुख जैन, संजय शहा, गिरीष ललवानी, राजु सुराणा, भरत देवडा, आषिश जैन, सतिष संचेती, अशोक गेलडा, नरेन्द्र गेलडा, अनिलकुमार संचेती, मिठालाल कांकरीया, हीरालाल भंडारी सह शेकडो भाविक उपस्थित होते ! हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री आनंदजी कल्यानजी जैन श्वेताम्बर मंदिर ट्रस्ट व अभय मांगलिक मंडल, महीला मंडळातर्फे परीश्रम घेण्यात आले

# ‘झापुक झुपूक’ वादाच्या भोवऱ्यात

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

बिग बॉस ५ चा विजेता सूरज चव्हाण ‘झापुक झुपूक’ या नुकत्याच रिलीज झालेल्या मराठी सिनेमातून झळकत आहे. बारामतीमधील एका छोट्याशा गावातून आलेल्या सूरजने त्याच्या साधेपणाने सर्वांचंच मन जिंकून घेतलं. दिग्दर्शक केदार शिंदेंनी बिग बॉस मराठी सिझन ५ च्या मंचावरूनच त्याला थेट सिनेमात हिरोची भूमिका साकारण्याची संधी दिली. सूरजचा ’झापुक झुपूक’ आता महाराष्ट्रातील सर्व थिएटर्समध्ये झळकत आहे. मात्र आता झापुक झुपूक या नावावरून नवा वाद निर्माण झाला आहे.

सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर रावडी नेता म्हणजेच सागर शिंदे याने बिग बॉस ५ चा विजेता सूरज चव्हाण याच्यावर गंभीर आरोप केले आहेत. नुकत्याच रिलीज झालेल्या केदार शिंदे दिग्दर्शित ‘झापुक झुपूक’ या चित्रपटाला प्रेक्षकांकडून फार कमी प्रतिसाद मिळत आहे. पहिल्याच दिवशी या सिनेमानंने २४ लाखांची कमाई केली मात्र सहाव्या दिवशीही ही कमाई तितकीच राहिली आहे. सूरज बिग बॉस मध्ये असल्यापासूनच त्याच्या अनेक हटके डायलॉगने प्रेक्षकांची मने जिंकली. ‘झापुक झुपूक’ हा डायलॉग सुरजचा नसून सागर शिंदेचा असल्याचं सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर सागर शिंदे याचं म्हणणं आहे. सागरने त्याच्या यूट्यूब चॅनलवर व्हिडीओ पोस्ट करत दिली आहे.

**काय म्हणाला सागर शिंदे ?**

सागर शिंदे म्हणाला ‘ लहानपनापासूनच ’झापुक झुपूक हा शब्द मी वापरत आलो आहे. २०२२ मध्ये ’झापुक झुपूक’ हा शब्द मी एका व्हिडीओ मधून पुढे आणला. त्यानंतर २०२३ मध्ये लोकांनी तो डायलॉग उचलून धरला. तसेच सुरजनेही तो त्याच्या व्हिडीओमध्ये वापरण्यास सुरुवात केली. सुरजने बिग बॉसमध्ये हा शब्द वापरल्यामुळे जास्तच चर्चेत आला. माझा हा डायलॉग वापरून सूरज चव्हाण मोठा झाला आहे. हा त्याचा नाही तर माझा डायलॉग आहे. मी हा शब्द रजिस्टर देखील केला आहे.‘ असं सागर शिंदेने त्याच्या रावडी नेता या यूट्यूब चॅनलवर व्हिडीओ पोस्ट करत सांगितले आहे.

# लोकांकडे अजूनही २००० रुपयांच्या नोटा! ६,२६६ कोटी अद्याप पडून

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) - रिझर्व्ह बँकेने २००० रुपयांची नोट रद्द करण्याचा निर्णय घेऊन जवळजवळ दोन वर्षे झाली आहेत, परंतु या नोटांपैकी मोठ्या प्रमाणात नोटा अजूनही लोकांकडे पडून आहेत. हे इतके मोठे आहेत की त्यांची एकूण किंमत तब्बल ६२६६ कोटी रुपये आहे. आरबीआयने शुक्रवारी सादर केलेल्या अहवालाद्वारे ही माहिती दिली आहे. नोटा रद्द करण्याच्या निर्णयानंतरही २००० रुपयांच्या नोटा कायदेशीर चलनात राहतील. रिझर्व्ह बँकेने १९ मे २०२३ रोजी २००० रुपयांच्या नोटा चलनातून काढून टाकण्याची घोषणा केली होती. आरबीआयने शुक्रवारी दिनांक २ मे रोजी एका निवेदनात म्हटले आहे की, १९ मे २०२३ रोजी व्यवहार बंद होताना २००० रुपयांच्या एकूण नोटांचे मूल्य ३.५६ लाख कोटी रुपये होते, ते ३० एप्रिल २०२५ रोजी व्यवहार बंद होताना ६,२६६ कोटी रुपयांवर आले आहे.

# कन्नड येथे १ कोटी २२ लाखांचा गांजा जप्त

## कन्नड शहर पोलीस ठाणे पोलीसांनी धडक कारवाई



**कन्नड (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गुप्त खबऱ्याकडून शहर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक कुणाल सुर्यवंशी यांना दाभाडी शिवारातील नशोबखाँ सांडेखाँ पठाण यांच्या मालकीच्या शेतातील घरात सुमारे सव्वा कोटीचा गांजा जप्त केला. उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड, पोलीस निरीक्षक आर.बी.सानप यांनी पोलीस पथकासह सापळा रचून ही कारवाई केली. हा गांजा ४०९ किलो इतका आहे. याची किंमत १ कोटी २२ लाख ७० हजार रूपये आहे.

या कारवाईत नशीबखाँ सांडेखाँ पठाण, वय ४२ वर्षे, रा. कंजखेडा ता. कन्नड, इम्राण लियाकत खाँन, वय ३८ वर्षे, मुक्तीवार मुसा खाँन, वय ४५ वर्षे, दोघे रा. वालसमद तहसील कचरावत जि. खरगोन मध्यप्रदेश, विजय रामचंद्र नाहर, वय ३८ वर्षे, रा. आस्का जि.गजम राज्य ओरीसा, रामकृष्ण हरकीत नायक, वय ३३ वर्षे, रा. बावनगंजम ता. टिजली जि. गंजम राज्य ओरीसा यांना मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. पुढील तपास पोलीस निरीक्षक रंगराव सानप करीत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपुर्णा सिंह, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड, पोलीस निरीक्षक आर.बी.सानप, सहायक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी, यांनी केली.

## आरटीओ ऑफिसात फिल्मी स्टाईल फाईट! महिला कर्मचाऱ्याला मारहाण, संगणक तोडफोड!

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुंबईच्या अंधेरी आरटीओ कार्यालयात फिल्मी स्टाईल फाईट पहायला मिळाली. ईशा नावाच्या महिलेने आरटीओ कार्यालयात घुसून गाडी नावावर न झाल्याने थेट वाद घातला आणि वरिष्ठ लिपीक वृषाली काळे यांच्याशी वादविवाद केला. गाडी कोणालाही न विकताच स्नेहा पांडे यांच्या नावावर कशी गेली? या रागातून ईशाने कर्मचाऱ्यांवर चक्क हात उचलला!

कनिष्ठ लिपीक सुश्मिता भोगले यांनी समजावण्याचा प्रयत्न केला, पण संतप्त ईशाने त्यांनाही नाही सोडलं. आरटीओ कार्यालयात शिवीगाळ, मारहाण आणि संगणक फोडाफोड! या थेट हल्ल्यामुळे संपूर्ण आरटीओ कार्यालयात एकच खळबळ उडाली.

अंबोली पोलिसांनी ईशा विरोधात आयपीसी कलम १३२, १२२(२), ३२४(२), ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी मराठा मावळा संघटनेचे 'बोंबा मारो' आंदोलन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

कर्जमाफी हा शेतकऱ्यांचा हक्क आहे, यामुळे शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळावी, या मागणीसाठी मराठा मावळा संघटनेच्यावतीने शुक्रवारी दिवसभर विभागीय आयुक्त कार्यालयासमोर जोरदार धरणे धरली आणि सरकारविरोधी बोम्बा मारल्या.

मावळा संघटनेच्यावतीने गेल्या काही दिवसांपासून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची मागणी केली जात आहे. मावळा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. माणिकराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. विविध जिल्ह्यातील शेतकरी आणि संघटनेचे पदाधिकारी या आंदोलनात सहभागी झाले होते.यावेळी शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळालीच पाहिजे, सोयाबिनला साडेसहा हजार रुपये प्रती क्वींटल हमी भाव मिळालाच पाहिजे,शेतकऱ्यांना वीज बील माफ करुन भारनियमनमुक्त करा, प्रधानमंत्री पिक विमा योजनेतील त्रूटी दूर करुन सर्व बाधित शेतकऱ्यांना पीक विमा देण्यात यावा, बीड, धाराशवी, लातुर आणि परभणी जिल्ह्यात झालेल्या पीक विमा घोटाळ्याची चौकशी करुन दोषीवर कारवाई करा, शेती पंपासाठी तात्काळ नवीन रोहित्र देण्याची व्यवस्था करावी आदी मागण्या आंदोलकांनी केल्या. यावेळी देवेंद्र फडणवीस हाय, हाय, अजीत दादा हाय हाय, या सरकारचे करायचे काय, खाली मुंडके वर पाय आदी घोषणा देत राज्यसरकारच्या नावाने बोंबा मारल्या. या आंदोलनात पंढरीनाथ गोडसे पाटील, भारत कदम, गणेश वडकर, हनुमंत कदम, गोपीनाथ निकम पाटील, विजय म्हस्के, बाळासाहेब भुमे, कल्पना चव्हाण, रंजना कोलते, ज्योती पवार, सुनीता पाटील, जयश्री दाभाडे, विद्या माहिते, रजनी अजबे, प्रतिभा बागडे, राणी पवार, लता कासार, छाया महेर, राजकन्या जावळे, मीना शिंदे, मनीषा जगताप आणि रेखा थिटे आदींसह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# ब्लॅक स्पॉट शोधण्यासाठी पोलीस, परिवहन आणि बांधकाम विभागाने संयुक्त मोहिम राबवावी- जिल्हाधिकारी स्वामी यांचे निर्देश


**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

ज्याठिकाणी गेल्या तीन वर्षात पाच पेक्षा अधिक अपघात ५०० मीटर परिसरात झाले असतील असे ब्लॅक स्पॉट शोधण्यासाठी पोलीस दल, प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संयुक्त पथकाने मोहिम राबवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

रस्ता सुरक्षा समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आज पार पडली, अधीक्षक अभियंता एस.एस. भगत, उप प्रादेशीक परिवहन अधिकारी स्वप्नील माने, डॉ. महेश लढ्ढा, महामार्ग पोलीस अधीक्षक रुपाली दातेकर, कार्यकारी अभियंता एस.जी. केंद्रे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीकांत डिसले आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्ह्यात महामार्ग, राज्य मार्ग यांवरील ब्लॅक स्पॉट शोधून त्यावर उपाययोजना, दर्शक सुचना फलक लावणे, वेग मर्यादा दर्शक फलक लावणे, महामार्गावर अनधिकृतरित्या डिव्हायडर तोडून ठेवले आहेत,ते पुन्हा स्थापीत करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करणे आदी उपाययोजना राबवाव्या. जिल्ह्यातील रस्ते अपघाताचे प्रमाण शून्यावर आणणे, अपघातानंतर जखमींना तात्काळ उपचार सुविधा उपलब्ध करुन मृत्यूदर शून्यावर आणणे या उद्दिष्टांसह हे काम साऱ्यांनी करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

# महाराष्ट्र दिनी मनपा शाळेतील बँड पथकाचे मंत्रमुग्ध सादरीकरण



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या संकल्पनेतून महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी व त्यांच्या कलागुणांना विकसित करण्यासाठी महानगरपालिकेच्या शाळेत नामांकित संगीत प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती तसेच शाळेला विविध वाद्य आणि संगीत साहित्य उपलब्ध करुन दिले होते आणि या विद्यार्थ्यांचा एक चांगला म्युझिक बँड तयार व्हावा अशी अपेक्षा जी श्रीकांत आयुक्त तथा प्रशासक यांनी व्यक्त केली होती.

म्हणून या संगीत प्रशिक्षकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध संगीत/ गाणे शिकविले जात होते त्या मध्ये भरतनाट्य, कथ्थक नृत्य, तबला, हार्मोनियम, बासरी वाद्य, सेक्सोफोन तसेच विविध वाद्य वर गाणे शिकविले जात होते यामुळे विद्यार्थ्यांना शाळेची आवड निर्माण झाली असून उपस्थिती सुद्धा वाढली आहे तसेच त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी एक मे महाराष्ट्र दिनानिमित महानगरपालिका मुख्य कार्यालय झेंडावंदन वेळेस राष्ट्रगीत व राज्यगीत विविध संगीत साधनांच्या माध्यमातून गायले तसेच विविध गाणे बँड मधून वाजविण्यात आले. तसेच कथ्थक व भरतनाट्यम चे सादरीकरण करण्यात आले. या बँड पथकात मनपा के प्रा शाळा मुकुंदवाडी, मनपा के प्रा शा इंदिरानगर बायजीपुरा, मनपा के प्रा शा किराडपुरा न.०१, मनपा के प्रा शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर, मनपा के प्रा शाळा बेगमपुरा, मनपा के प्रा शाळा नारेगाव मराठी, मनपा के प्रा शाळा हर्सूल, या शाळेतील विद्यार्थ्यानी सहभाग घेतला होता या विद्यार्थ्यांचे सादरीकरण पाहून आयुक्त तथा प्रशासक, अतिरिक्त आयुक्त, उप आयुक्त तसेच सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे तोंड भरून कौतुक केले. या बँड साठी उप आयुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे व नियंत्रण अधिकारी गणेश दांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व संगीत प्रशिक्षक,मुख्याध्यापक, तसेच ज्ञानदेव सांगळे कार्यक्रम अधिकारी,भारत तीनगोटे शिक्षण अधिकारी, यांनी परिश्रम घेतले.

# महावितरणमध्ये गुणवंत तांत्रिक कामगार पुरस्कार सोहळा थाटात

## छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील ४२ तंत्रज्ञ, यंत्रचालकांचा गौरव

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडल कार्यालयात गुरुवारी (१ मे) महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

कामगार दिनानिमित्त वर्षभरात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तंत्रज्ञ व यंत्रचालक संवर्गातील ४२ कर्मचाऱ्यांना गुणवंत तांत्रिक कामगार पुरस्काराने गौरवण्यात आले. तापडिया नाट्यमंदिरात झालेल्या समारंभात छत्रपती संभाजीनगर शहर मंडलातील चंद्रकांत वाघचौरे, प्रदीप बारस्कर, श्रीकृष्णा बनकर, अजय खुळे, अरुण दुबाले, किसन ढाले, शंकर शिंदे, उद्धव मुंढे, विनोद तित्तर, शिवाजी फुलारे, मनोज पुरी, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलातील नीलेश पवार, धनंजय पालस्टे, योगेश शिंदे, मनीराम सतुके, श्रद्धा पोहरे, रवी शेवाळे, अंगद वणवे, रमेश जाधव, अण्णासाहेब हिवाळे, महेश साळुंके, संजय बारगळ, अनिल बहादुरे, सोमीनाथ ठोंबरे, पंढरीनाथ सपकाळ, कमल पाचकोरे, बाबासाहेब लांडे, कृष्णा सनान्से, पंडित आहेर, रिझवान पठाण तर जालना मंडलातील सुनील मांटे, शुभांगी उइके, भाऊसाहेब मिसाळ, मच्छिंद्र लोंढे, भगवान नागरे, रवींद्र जाधव, रवींद्र वाघ, अविनाश गावडे, रामू गायकवाड, अरुण जाधव, बापू मिसाळ, प्रवीण घोरपडे या कर्मचाऱ्यांना गौरवण्यात आले. अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या वतीने नुकत्याच कोल्हापुरात झालेल्या कॅरम स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणारे प्रधान तंत्रज्ञ सचिन केळकर यांचाही या कार्यक्रमात विशेष सत्कार करण्यात आला.

यंदा प्रथमच मुख्य अभियंता कछोट यांच्या संकल्पनेतून गुणवंत कामगारांचे कौतुक बघण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांनाही विशेष निमंत्रित करण्यात आले. अनेक कर्मचाऱ्यांनी आपले आईवडील, पत्नी, मुलांसह हा पुरस्कार स्वीकारला. कामगारांना गौरवताना त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता.

तसेच पुरस्कारार्थींना सेवानिवृत्त होईपर्यंत गणवेशावर लावण्यासाठी 'गुणवंत कामगार - २०२५' अशी नेमप्लेटही देण्यात आली. कार्यक्रमात सुरुवातीला मेडिकव्हर रुग्णालयाचे डॉ. किशोर मुंडे यांनी 'अस्थिरोग बचाव व व्यवस्थापन' या विषयावर तर गुंतवणूक सल्लागार दीपेश पटणी यांनी 'शेअर मार्केट - गुंतवणूक की जुगार' या विषयावर उपस्थितांचे प्रबोधन केले.

मुख्य अभियंता कछोट म्हणाले की, पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांनी यापुढेही अधिक चांगले काम करावे आणि इतरांनीही त्यापासून प्रेरणा घ्यावी. सुरळीत वीजपुरवठा, ग्राहकसेवा व वीजबिल वसुली या तिन्ही आघाड्यांवर आगामी वर्षात सर्वोत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. कार्यक्रमास अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, संदीप दरवडे, शुभांगी कटकधोंड, बीना सावंत, वरिष्ठ व्यवस्थापक लक्ष्मीकांत राजेल्ली, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील, कार्यकारी अभियंता सतीश खाकसे, प्रसाद महातोले, महेश पाटील, शैलेश कलंत्री, भूषण पहूरकर, रमेश वाघचौरे, अविनाश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांनी सूत्रसंचालन केले. व्यवस्थापक बापू शिंदे, सागर अग्रवाल यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# जातीनिहाय जनगणनेतून प्रत्येक वर्गाला न्याय मिळणार - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**अमरावती (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

केंद्र शासनाने जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे प्रत्येक घटकाचे प्रतिनिधित्व माहिती होण्यास मदत मिळणार आहे. यातून आलेल्या संख्यात्मक आकडेवारीतून त्या-त्या घटकांसाठी विकासात्मक योजना राबविण्यास मदत होईल. यातून मागास वर्गासह प्रत्येक वर्गाला न्याय मिळणार असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. वरुड तहसील कार्यालयात आज छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान घेण्यात आले. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार सुधाकर कोहळे, उमेश यावलकर, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार आदी उपस्थित होते. श्री. बावनकुळे म्हणाले, शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवून त्यांचे जीवन सुखकर करण्यात येत आहे. जिवंत सातबारा ही मोहीम राबवून सातबारावरील मृत्यू झालेल्यांची नावे वगळून केवळ जिवंत व्यक्तींच्या नावांचे सातबारे शेतकऱ्यांना घरपोच वितरित करण्यात येत आहे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

•Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 •Email : attalsanket2023@gmail.com •RNI No. MAHMAR/2023/87816